

दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मान्यवर.

# हळबे महाविद्यालयातर्फे माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

**दोडामार्ग (पुढारी वृत्तसेवा) :** दोडामार्गसारख्या दुर्गम भागातील आमचे विद्यार्थी नावारुपाला येत आहेत. डिजिटल इंडियाची कास धरून अनेक संशोधन करत आहेत. नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात हे विद्यार्थी नक्की क्रांती करतील, असे गौरवोद्गार कार्याध्यक्ष अभिजित हेगशेटये यांनी काढले. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. प्राध्यापक, व आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तर कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे यांनी तर प्रा. गौरेश कर्पे यांनी आभार मानले.